# Application

Date :16/02/2022

To,

The Deputy Registrar,

P.G. Section (Ph.D. Unit),

S.R.T.M. University,

Nanded.

विषय :- पीएच. डी. पदवीचे अंतिम प्रबंध दाखल करणे बाबत.

**(Ph.D. Final Thesis Submission)**

उपरोक्त विषयी आपणांस विनंती करण्यात येते की, माझे संशोधक विद्यार्थी गायकवाड प्रतिमा बाळासाहेब हया मानव्य विद्याशाखेअंतर्गत इतिहास या विषयात पीएच. डी. पदवीसाठी संशोधन कार्य करत आहेत. **"मराठवाड्यातील दलित संघटना स्वरुप व कार्य : एक चिकीत्सक अभ्यास"** या विषयावर माझ्या मार्गदर्शनाअंतर्गत संशोधन कार्य पूर्ण झाले असुन त्यांचा पीएच.डी. पदवीचा अंतिम प्रबंध (Ph.D Final Thesis) दाखल करुन घेण्यास परवानगी देण्यात यावी ही नम्र विनंती.

Forwarded.

16/02/2022

आपला विश्वासु,

12/02/22

प्रा. डॉ. सूर्यवंशी एन. बी.

Dr. Suryavanshi N.B.

(M.A., M.Phil., Ph.D.)

इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक

Shivneri Mahavidyalaya, Shiruranantpal

Dist. Latur - 413544

शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ,जि.लातूर.

School ... S.R.T.M. University ...

Five thesis received

16/02/2022

माहिती, धाडस, ठिकाणाची योग्य निवड व त्यातून स्वराज्याच्या झालेल्या आर्थिक नुकसानाची आकि भरपाई करण्याचे नियोजन शिवाजीराजेंनी यशस्वी केले.

**मिर्झाराजे जयसिंगाची स्वारी व शिवाजीराजांची दोन पावले माघार**

सुरत लूटीमुळे चिडलेल्या औरंगजेबाने शिवाजीराजेच्या विरोधात कसलेला सेनापती मिर्झाराजे जयसिंग याची नियुक्ती केली. शेवटी शिवाजीराजांना मोघलांनबरोबर पुरंदरचा तह करावा लागला व शेवटी मिर्झाराजे जयसिंगाच्या आग्रहाखातर औरंगजेबाच्या भेटीसाठी आग्र्याला जावे लागले आग्र्याला मोगल दराबारातही मराठा अस्मितेचे दर्शन घडविले शेवटी औरंगजेबाकडून शिवाजीराजेंना दगाफटका करण्याचा विचार केले तेव्हा सर्वप्रथम औरंगजेबाकडून फर्मान काढून आपल्या सैन्याला दक्षिणेत जाण्याचे परवाने मिळवून दिले. त्यानंतर संभाजीची व स्वतःची सुटका केली. दिल्लीचा मोगल बादशाह औरंगजेबाच्या तावडीतून सुखरुप सुटून आपण स्वराज्याचे युवराज शंभूराजे व सोबत नेलेले सर्व सैनिक सहीसलामत स्वराज्यात परतले. यात शिवाजी राजाचे धाडस, काटेकोर नियोजन व प्रचंड मुत्सदेगिरी दिसुन येते. त्यानंतर शिवाजी राजानी पुन्हा एकदा सैनिकी आघाडी उघडून मोघलांकडे गलेले किल्ले परत मिळविले. त्याच बरोबर स्वराज्याचा विस्तार केला. स्वतःला ६ जून १६७४ रोजी राज्यभिषेक केला व स्वराज्याला छत्रपती मिळाला. पुढे कर्नाटकावर स्वारी करुन तेथील भूप्रदेश स्वराज्याला जोडला. प्रचंड धनसंपत्ती प्राप्त केली. स्वराज्याला चांगली प्रशासन व्यवस्था नियुक्त केली.

शेवटी आजारी पडून ३ एप्रिल १६८० ला शिवाजी राजे स्वर्गवाशी झाले. वरील सर्व घटनांवरुन आपणास शिवाजी राजांच्या अष्टपैलु व्यक्तीमत्वाचे दर्शन घडते. राजांची मुत्सदेगीरी, धाडस, नियोजन, विलक्षण बुध्दीमत्ता, नाविन्यता, सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी सवंगड्याची काळजी, शिस्त, स्वराज्य आगोदर व आपण नंतर ही भावना, आदेशाची



एकवाक्यता संघटन कौशल्य, धर्मसहिष्णुता, न्यायप्रिय, अखंड हिंदुस्थानात असा राजा झाला नाही म्हणून म्हणावेसे वाटते

निश्चयाचा महामेरु । बहुत जनासी आधारु ॥
अखंडस्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥

**संदर्भ ग्रंथ :**


1. जाधव नामदेव - शिवाजी द मॅनेजमेंट गुरू, राजमाता प्रकाशन, मुंबई -८३, २०१२
2. खोले विलास (संपा.) आज्ञापत्र, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००८
3. घोरपडे आनंद, शिवछत्रपती समज - अपसमज लोकशक्ती प्रकाशन, मुंबई,२००१
4. मेहेंदळे गजानन भास्कर - श्री राजा शिवछत्रपती भाग -१ व २, डायमंड पब्लिकेशन, पुणे,१९९९
5. Dr. Pathan Zakir-Maratha Administration,Chandralok Prakashan, Kanpur, २०१४


***

झाले. प्रचंड धनसंपत्ती, कापड चेपड, शस्त्रास्त्रे, हत्ती, घोडे, जड जवाहीर महाराजांच्या हाती लागले. शिवाजी महाराजांनी धैर्याने व मुत्सदेगीरीने स्वराज्यावर आलेले हे संकट सैन्याला पुढे करुन नव्हे तर स्वतःचा जीव धोक्यात घालून परतवून लावले व स्वराज्य टिकविले पुढे आदिलशहाने शिवाजीराजांचा बंदोबस्त करण्यासाठी सिध्दीजोहरला पाठविले. अफझलखानाच्या वधानंतर शिवाजीराजांनी २८ नोव्हेंबर १६५९ रोजी पन्हाळगड जिंकून घेतला केवळ आठरा दिवसात वाईपासून ते पन्हाळगडापर्यंतचा विस्तीर्ण प्रदेश जिंकून घेवून स्वराज्याला जोडला एकंदरीत आदिलशहा व आदिलशाही दरबार हादरला आदिलशहाने शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्याची विनंती दिल्लीच्या मोगल बादशहाकडे केली.

**पन्हाळगडाच्या वेढ्यातून सुटका**

महाराजांच्या मुत्सदेगिरीचे व धाडसाचे आणखी एक उदाहरण म्हणजे सिध्दीजोहरने पन्नास हजार फौजेनिशी पन्हाळगडाला वेढा घातला. त्यातून महाराजांनी स्वतःची सुखरुप सुटका करुन घेतली. यात त्यांनी जिवावर जीव ओवाळून टाकणारे अनेक सवंगडी निर्माण केले होते.त्यापैकी एक बाजीप्रभू ३०० मावळ्यांना सोबत घेवून खिंड लढवली परिणामी महाराज विशाळगडाला पोहचले. अशा रितीने शिवाजी राजांनी मुत्सदेगिरी व धाडसाचा वापर करुन अदिलशाही प्रदेशात स्वराज्याचा प्रचंड विस्तार केला.

**शाहिस्तेखानाची फजिती**

दिल्लीचा मोघल बादशहा औरंगजेब याने शिवाजी राजांचा बंदोबस्त करण्यासाठी आपला मामा शाहिस्तेखान याला स्वराज्यावर पाठविले. प्रचंड सैन्यनिशी तो स्वराज्यात येवून धडकला त्याने १० मे १६६० रोजी पुण्यातील शिवाजी राजांच्या लालमहालात तळ ठोकला त्या परिसरातील अनेक मराठा सरदार स्वार्थापोटी खानला मिळाले शाहिस्तेखानने स्वराज्याची चहूबाजूने कोंडी केली. शाहिस्तेखानाने स्वराज्याचा प्रदेश



Head & Assist Professor,
Dept of Commerce,

बेचिराख केला जवळपास तीन वर्षाच्या कालावधीत पुण्यात मुक्काम ठोकून स्वराज्याची धूळधान केली. शेवटी शिवाजी राजांनी शाहिस्तेखानावर हल्ला करण्यासाठी ५ एप्रिल १६६३ हा दिवस निवडला राजांचे बालपण लालमहालात गेलेले असल्यामुळे त्यांना लालमहालाची माहिती होती. वरातीतून शिवाजी राजे पुण्यात शिरले . पहाऱ्यावर गेल्याची बतावणी करुन ते लालमहालात घुसले. त्यांनी खानाच्या जनानखान्यात प्रवेश केला.कापाकापी सुरू झाली. त्यात खानाचा मुलगा फतेहखान मारला गेला. खानाच्या स्त्रीयांनी दिवे विझवले तरी परंतु शिवाजी राजे खानाचा शोध घेत जनान खान्यात शिरले खिडकीतून उडी मारणाऱ्या खानावर अंदाजाने वार केला. खान मेला असे समजून शिवाजीराजे व त्यांचे सहकारी सिंहगडाकडे निघून गेले.शेवटी खानाने शिवाजी राजांची धास्ती घेतली व पुणे सोडून औरंगाबादला निघून गेला. या घटनेत शिवाजीराजांचे वेगळेपण दिसुन येते बलाढ्या अशा मोघल सरदारबरोबर समोरा समोर युध्द करणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी निवडक सैन्याला सोबत घेवून शाहिस्तेखानाचा बंदोबस्त केला.

इतिहास ही घटनांची साखळी आहे या न्यायाने एका पाठोपाठ एक संकटे स्वराज्यावर येत गेली.

**सूरत लूट**

शिवाजी महाराजांचे धाडस व नियोजनाचे प्रतिक शाहिस्तेखानाने सतत तीन वर्ष स्वराज्याची धूळधान उडविली होती. स्वराज्याचे झालेले नुकसान परस्पर भरुन काढण्यासाठी सुरतेवर स्वारी करण्याची योजना महाराजांनी आखली. ६ डिसेंबर १६६४ ला रायगडावरुन निघून ६ जानेवारीला ते सुरतेत पोहचले प्रचंड लूट सोबत घेवून १० जानेवारीला त्यानी सुरत सोडले आती वेगाने सुरतेवर स्वारी करुन मोघल सरदार शाहिस्तेखान स्वारीचा बदला घेतला. एवढेच नव्हे तर सुरतेतील इंग्रज, डच, फ्रेंच, पोंतूगीज या परकीय सत्तावर देखील वचक बसविला. जशास तसे उत्तर मोघलांना दिले या घटनेतही राजांनी काटेकोर नियोजन गुप्त

शहाजीराजे आदिलशाहीचे सरदार त्यांना पुणे, सुपे, जहागीरी मिळाली होती. राजमाता जिजाऊ व बालशिवाजी या जहागिरीत येवून दाखल झाले. जहागीरीतील पाटील, पटवारी, कुलकणी, देशमुख, देशपांडे या वतनदारांना ऐनकेन प्रकारे आपल्या वर्चस्वाखाली आणले.

### जहागिरीतील किल्ले ताब्यात

जहागिरीचा प्रदेश शिवाजी राज्यांच्या ताब्यात होता. पण त्या जहागिरीतील किल्ले आदिलशहाच्या ताब्यात होते. ज्याच्या ताब्यात किल्ले तो आजुबाजुच्या प्रदेशाचा स्वामी आशीच परिस्थिती होती. कोंढाणा, पुरंदर, चाकण, तोरणा, राजगड, रोहिडा, सुभान मंगल हे किल्ले जहागिरीच्या परिसरात होते. हे किल्ले घेतल्याशिवाय खऱ्या अर्थाने जहागिरीच्या भूप्रदेशावर शिवाजी राज्याचे वर्चस्व प्रस्थापीत होणार नव्हते.म्हणूनच शिवाजी राजांनी हे किल्ले घेवून स्वराज्य स्थापनेचे नियोजन केले. शिवाजी राजांनी किल्ल्याची पाहणी केली. पावसाळ्याच्या दिवसात किल्यावरील सैन्य पायत्याच्या गावात येवून राहत असे अशीच स्थिती तोरणा किल्याची होती शिवरायांनी काही सवंगडी सैन्य सोबत घेवून किल्ल्यावर हल्ला केला. किल्ल्यातील मुस्लिम सैन्य पळून गेले व किल्ला शिवरायांच्या हाती आला. पुढील काळात त्यांनी मुरुंबगड म्हणजे राजगड, कोंढाणा, पुरंदर, चाकण, शिवनेरी, इत्यादी किल्ले आपल्या ताब्यात घेतले.

### जावळीवर वर्चस्व

जावळीचे चंद्रराव मोरे हे आदिलशाहचे मांडलीक होते. जावळीचा प्रदेश डोंगर दऱ्याचा व घनदाट जंगलाचा होता. याच जावळीतून कोकणात उतरण्यासाठी अनेक वाटा होत्या. हा प्रदेश दुर्गम असल्यामुळे स्वराज्यासाठी आवश्यक होता. शिवाजी राजांनी चंद्ररावाला आपल्या सोबत घेण्याचा प्रयत्न केला मात्र चंद्ररावांनी शिवाजी राजांना विरोध केला शेवटी १५ जानेवारी १६५६ रोजी शिवाजी महाराजांनी जावळीवर स्वारी केली आणि जावळी ताब्यात घेतली त्याच भागातील रायरी



किल्लाही शिवाजी राजाच्या ताब्यात आला. अशा रितीने स्वराज्याच भौगोलिक विस्तार घडून आला.

### शिवाजी महाराजांची मुत्सदेगिरी आणि अफझलखानाचा वध

जावळीच्या चंद्रराव मोऱ्याचा पराभव करुन जावळी ताब्यात घेतल्यानंतर अदिलशहाने आपला मातब्बर सरदार वाईचा सुभेदार या‍ प्रचंड सैन्यानिशी शिवाजी महाराजांच्या विरोधात पाठविले प्रचंड सैन्य शस्त्रास्त्रे घेवून अफझलखान वाईला येवून दाखल झाला. त्याने स्वराज्यातील अनेक पाटील व देशमुखांना आदिलशाही फरमाने पाठवून आपल्या बाजूने वळविले स्वराज्यातील जनता हवालदिल झाली अशा परिस्थीतीत शिवाजी महाराजांनी मुत्सदेगिरीने अफझलखानाला प्रतापगडाच्या पायथ्याला आणण्यात यश मिळविले. महाराजांना खानाचा हेतू महित होता त्यामुळे ते पुर्ण सावध होते. शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्याला पुढे न करता त्यांनी स्वतः अफझलखानापुढे गेले अफझलखानाची व शिवाजी महाराजांची १० नोव्हेंबर १६५९ रोजी प्रतापगडाच्या पायथ्याला उभारलेल्या शामीयान्यात भेट झाली. झालेल्या भेटीत खानाने शिवाजी महाराजांची मान आवळली व कट्यारीने वार केला.तेंव्हा प्रसंगावधान साधुन राजांनी सोबत असलेल्या वाघनख्यानी खानाचा कोतळा बाहेर काढला व खानाला ठार केला. तावडतोब प्रतापगडावर जावून त्यांनी तोफेचा बार केला येथे आपणास शिवाजी महाराजांचे व्यवस्थापन कौशल्य लक्षात येते. शिवाजी महाराजांनी अफझलखान व त्याच्या सैन्याचा एकाच वेळी बंदोबस्त करण्याचे नियोजन केले होते. म्हणजे अफझलखानाला व त्याच्या अंगरक्षकांना तेवढे प्रतापगडाच्या पायथ्याकडे आणण्यात यश मिळविले तर त्याचे बाकीचे सैन्य बेसावध अवस्थेते प्रतापगडापासून दूर अंतरावर राहिले. त्या सैन्याच्या बाजूने जंगलाच्या आश्रयाने मराठ्यांचे सैन्य पेरुन ठेवले व ठरल्याप्रमाणे तोफेचा बार होताच शिवाजी महाराजांच्या सैन्याने अफझलखानाच्या सैन्यावर हल्ला चढविला.बेसावध अफझलखानाचे सैन्य काही वेळातच पराभूत

# निश्चयाचा महामेरु - छत्रपती शिवाजी

डॉ. नारायण सूर्यवंशी
शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ, जि.लातूर

अखंड हिंदुस्थानात असंख्य भारतीय राजवंशात परकिय शत्रुसत्तांना रोखण्याचे सामर्थ्य दिसत नाही.उत्तरेकडील लढवय्या जमाती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजपुतांनी मुस्लिम आक्रमकांपुढे आपल्या तलवारी म्यॅन केल्या व वेळप्रसंगी शरनागती पत्करली. याच परकीय मुस्लिम आक्रमकांनी जवळ जवळ संपूण भारत आपल्या सत्तेखाली आणला. इ.स. १२०६ ते १५२६ या ३२० वर्षांच्या काळात गुलाम खिलजी, तुघलक, सय्यद आणि लोदी या वंशानी भारतावर अधिराज्य गाजविले . तुघलक वंशाच्या काळात दक्षिण भारतात बहामनी व विजयनगर साम्राज्याची स्थापना झाली. पुढे बहामनी साम्राज्याचे विभाजन होऊन दक्षिण भारतात विजापूरची अदिलशाही, गोवळकोंड्यांची कुतुबशाही, अहमदनगर ची निजामशाही,बिदरची बरीदशाही व इदिलाबादची इमादशाही या पाच सत्ताचा उदय झाला. उत्तर भारतात इ.स. १५२६ ला झालेल्या पहिल्या पानिपतच्या लढाईनंतर बाबराने मोघल सत्तेची स्थापना केली. बाबर,हुमायू, अकबर,जहांगीर,शहाजान व औरंगजेब यांनी बहुसंख्य भारत आपल्या सत्तेखाली आणला .औरंगजेबाच्या राजसत्तेच्या काळात त्याच्या कारकिर्दीचे शेवटचे २५ वर्ष त्याने दक्षिण भारतात विजापूरची अदिलशाही,गोवळकोंड्याची कुतूबशाही व मराठ्यांचे स्वराज्य संपविण्यासाठी घालविले. औरंगजेबला विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतूबशाही या दोन शिया मुस्लिम सत्ता संपविण्यात यश आले. मात्र महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य संपवता आले नाही. औरंगजेब बादशहाच्या कारकीर्दीत छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती राजाराम महाराज हे तीन मराठ्यांचे राज्यकर्त्यांचे देहावसन झाले त्यानंतर



महाराणी ताराबाईनी औरंगजेबा बरोबर लढा दिला शेवटी औरंगजेबाला मराठ्यांचे राज्य संपवता आले नाही या उलट त्याला महाराष्ट्राच्या भूमीत अखेरचा श्वास घ्यावा लागला.

म्हणजेच अखंड हिंदुस्तानात छत्रपती शिवाजी महाराजांनी मोघल सत्तेच्या व अदिलशाहीच्या चढत्या काळात स्वराज्य स्थापन केले. एवढेच नव्हे तर ते स्वराज्य अनंतकाळ टिकावे यासाठी स्वराज्यातील जनतेच्या मनात स्वराज्याबद्दल आस्था निर्माण केली व राजाबद्दल निष्ठा निर्माण केली. त्यामुळेच हे स्वराज्य औरंगजेबा सारख्या शक्तीशाली सम्राटापुढे तग धरु शकले. त्याचे कारण छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श व प्रेरणा हेच होती.

**शिवाजी महाराजांचा स्वराज्य स्थापनेचा संकल्प -**

एक सरदार पुत्र मध्ययुगात स्वराज्य स्थापण करण्याचा संकल्प करतो ही सोपी गोष्ट नव्हती कारण उत्तर भारत शक्तीशाली मोघल वंशाच्या सत्तेखाली होता तर दक्षिण भारत प्रामुख्याने महाराष्ट्र विजापूरच्या आदिशाही सत्तेखाली होता. स्वतः शिवाजी राजांचे वडिल विजापुरच्या दरबारात नोकरीला होते. तसेच महाराष्ट्रातील मातब्बर मराठा सरदार ही आदिलशाहीत चाकरीत होते. मराठा सरदाराच्या निष्ठा ह्या आदिलशाहाच्या चरणी वाहिल्या होत्या. अशा स्थितीत स्वराज्य स्थापनेचा संकल्प करणे हा वेडेपणाच होता. तरीही हे अशक्य काम शक्य करण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांनी तडीस नेले. एवढेच नव्हे तर ते राज्य अनंतकाळ टिकावे यासाठी तात्वीक बैठक लोकांनमध्ये निर्माण केली. आठरापगड जमातीतील तरुणाला किंवा मावळप्रातांतील सवंगड्यांना एकत्रित केले. त्यांच्यात स्वराज्य स्थापनेचा विचार भरला. त्यांना सोबत घेऊन स्वराज्य स्थापनेचा संकल्प केला एवढेच नव्हे तर तो संकल्प तडीस नेण्यासाठी किंवा पूर्ण करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग अथवा बलिदान देण्याची भावना सवंगड्यात निर्माण केली आणि याच सवंगड्याच्या मदतीने स्वराज्य स्थापन केले.

| | | | |
|---|---|---|---|
| ३०. | लोककल्याणकरी राजा छत्रपती शिवाजी महाराज | डॉ. शांता जाधवर (गीते)<br>सहा. प्रा. शशिकांत बी. पाटील | २४७ |
| ३१. | भारतीय नौदलाचे जनक- छत्रपती शिवाजी महाराज | डॉ. बब्रुवान मोरे | २५४ |
| ३२. | "शिवरायांचे आदर्श व्यक्तिमत्व" | प्रा. डॉ. अशोक गंगाराम सावणे | २६३ |
| ३३. | छत्रपती शिवाजी महाराज : एक दूरदर्शी जलसंवर्धक आणि जलव्यवस्थापक | भिकाणे शोभा राजेंद्र | २७३ |
| ३४. | शिवकालीन ग्राम प्रशासन | डॉ. टेंकाळे सुवर्णा उमाकांत | २७९ |
| ३५. | शिवकालीन स्त्रियांचा दर्जा..... | कराड शिवहार बापुराव | २८६ |
| ३६. | "छत्रपती शिवाजी महाराज यांचे शेतीविषयक धोरण" | प्रा. डॉ. कृष्णा मालकर<br>शिवाजी काशीनाथ गायकवाड | ३०१ |
| ३७. | मराठेकालीन (शिवकालीन) न्याय व राज्यव्यवस्था | डॉ. बंजारा दिलीप लालू | ३०७ |
| ३८. | छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ : ऐतिहासिक अभ्यास | डॉ. बाळासाहेब काळे | ३१२ |
| ३९. | छत्रपती शिवरायांचा वैज्ञानिक दृष्टीकोन | संतोष उध्दवराव झामरे | ३१९ |
| ४०. | शिवकालीन अष्टप्रधान मंडळाचे महत्व | डॉ. बब्रुवान मोरे | ३२२ |
| ४१. | "शिवकालीन लोकप्रशासन" | डॉ. लक्ष्मण काशिनाथ उलगडे | ३३३ |
| ४२. | शिवरायांचे आर्थिक धोरण | डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे | ३३६ |
| ४३. | शिवकालीन वाहतुकीची साधने; एक दृष्टीक्षेप | प्रा. डॉ. सुधाकर बाघ | ३४३ |





| | | | |
|---|---|---|---|
| ४४. | शिवकालीन अश्वदल | प्रा. डॉ. माधवी गो. महाके | ३४५ |
| ४५. | शिवकालीन चलनव्यवस्था | डॉ. शेख अब्दुल समद बादशहा | ३५२ |
| ४६. | शिवरायांचे कृषी विषयक धोरण | प्रा. बोचरे जे. एम. | ३५८ |
| ४७. | शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ | डॉ. चंदन एम. बावलगावे | ३६४ |
| ४८. | "छ. शिवाजी महाराजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन" | प्रा. डॉ. काशीनाथ एन. चव्हाण | ३६९ |
| ४९. | शिवकालीन राज्यव्यवस्था | प्रा. डॉ. शिंदे शाम भागवत | ३७४ |
| ५०. | शिवकालीन सैन्यप्रशासन | प्रा. जितेंद्र दिलीप पगार | ३८१ |
| ५१. | छत्रपती शिवरायांचे आर्थिक धोरण आणि नियोजन | डॉ. राजेश गं. उंबरकर | ३९१ |
| ५२. | छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेती व वतनदार विषयक धोरणांबाबत इतिहासकारांची मतमतांतरे | प्रा. डॉ. गणेश भामे | ४०१ |
| ५३. | शिवकाल : मराठवाडयातील स्थानीक लोकजीवनाचा ऐतिहासीक अभ्यास | डॉ. गणपत विष्णू गट्टी | ४११ |
| ५४. | निश्चयाचा महामेरु - छत्रपती शिवाजी | डॉ. नारायण सूर्यवंशी | ४१४ |
| ५५. | "शिवाजी महाराजांचे आर्थिक विचार" | प्रा. डॉ. राजू लक्ष्मण आदे | ४२२ |
| ५६. | छत्रपती शिवरायांचे सेनापती हंबीरराव मोहिते | डॉ. संतोष पाटील | ४३३ |
| ५७. | शिवरायांच्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता | प्रो.डॉ.डी.डी. चौधरी | ४४० |

ISBN No. 978-81-953976-5-5

संपादक

**डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे**

इतिहास विभाग प्रमुख,
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर
मो. ९९२२३५१६७८

**प्रकाशक**

सिद्धी पब्लिकेशन हाऊस
६२४, बेलानगर, भावसार चौक,
तरोडा (खु.) नांदेड - ४३१ ६०५.
मो. ९६२३९७९०६७

**मुद्रक**

अनुपम प्रिंटर्स, श्रीनगर, नांदेड.
मो. ९१७५३२४४३७

प्रथमावृत्ती : ३ डिसेंबर २०२१

सर्वाधिकार : महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

मुखपृष्ठ : सौ. पल्लवी शेटे

मुद्रित शोधन : डॉ. अनिल मुंढे

अक्षर जुळवणी : डॉ. राजेश उंबरकर

मूल्य : ३५०/-

Head & Assist Professor,
Dept of Commerce,
Shivneri Mahavityalaya
Shirur Anantpal Dist.Latur

## :: संपादकीय ::

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीर द्वारा संचलित महात्मा फुले महाविद्यालयाच्या इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "लोककल्याणकारी राजा शिवछत्रपती" या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे ऑनलाइन आयोजन करण्यात आलेले होते.

माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत बिरादार हे उपक्रमशील प्राचार्य असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राची स्थापना दिनांक ६ फेब्रुवारी २०१९ रोजी करण्यात आली व या अध्यासन केंद्राचे संचालक म्हणून प्रा. डॉ. बब्रुवान मोरे यांची नियुक्ती करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे दरवर्षी प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली अहमदपूर शहरात शिवजन्मोत्सवाचे आयोजन केले जाते. तसेच दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्रातर्फे वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा आयोजित केल्या जातात. या अध्यासन केंद्राचे महाविद्यालयाच्या ग्रंथालयात स्वतंत्र ग्रंथालय असून, सध्या ग्रंथसंख्या ८०० आहे, महाविद्यालयाचे सन्माननीय प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून देणगी स्वरूपातील ग्रंथभेट घेऊन ग्रंथालय साकारण्यात आलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज हे लोककल्याणकारी राजे होते. छत्रपती शिवरायांनी त्यांच्या अल्पकालखंडात शेतकऱ्यांच्या कल्याणाचे कार्य केले. शिवरायांनी कालवे निर्माण करून शेतकऱ्यांच्या जमिनीला पाणीपुरवठा केला. दुष्काळ पडल्यानंतर शेतकऱ्यांना बी-बियाणे व बैलजोड्या पुरविल्या. युद्धात कामी आलेल्या सैनिकांच्या परिवाराची काळजी घेतली, त्यांच्या मुलांच्या संगोपनासाठी मदत केली व मुलांना सैन्यात प्रवेश दिला.

शिवरायांनी उत्तम जल व्यवस्थापनाचे कार्य केले.शिवरायांनी निर्माण केलेल्या गड-किल्ल्यावर आजही आपणास पिण्यासाठी पाणी मिळते. भुईकोट किल्ले, डोंगरी किल्ले आणि सागरी किल्ले बांधताना त्या ठिकाणी पाण्याचे जिवंत झरे आहेत की नाही हे पाहूनच किल्ल्यांची निर्मिती केली गेली. शिवाजी महाराज वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणारे राजेहोते. शिवरायांनी अंधश्रद्धांना विरोध केला, जीवनात त्यांनी शकुन-अपशकुन कधीच पाळले नाहीत, शिवरायांनी महत्त्वाच्या लढाया अमावस्येच्या रात्री लढलेल्या आहेत व त्यामध्ये विजय प्राप्त केलेला आहे. शिवरायांनी परस्त्री मातेसमान मानली व शत्रूच्या पक्षातील स्त्रियांचा,

# लोककल्याणकारी राजा शिवछत्रपती

## "Benevolent King Shivchhatrapati"

संपादक

**डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे**

इतिहास विभाग प्रमुख,
महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

**सिद्धी पब्लिकेशन हाऊस, नांदेड.**

| प्रकरणाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|
| प्रकरण १<br>लातूर जिल्ह्याची भौगोलिक स्थिती | १-१२ |
| प्रकरण २<br>लातूर जिल्ह्याचा राजकीय इतिहास | १३-६८ |
| प्रकरण ३<br>लातूर जिल्ह्यातील गढींची रचना | ६९-१५३ |
| प्रकरण ४<br>लातूर जिल्ह्यातील वाड्यांची रचना | १५४-१८३ |
| प्रकरण ५<br>गढीवाड्यांच्या प्रभावाखालील समाजजीवन | १८४-२३१ |
| प्रकरण ६<br>गढीवाड्यांच्या प्रभावाखालील धार्मिक जीवन | २३२-२५३ |
| प्रकरण ७<br>गढीवाड्यांच्या प्रभावाखालील आर्थिक जीवन | २५४-२५९ |
| उपसंहार | २६०-२७५ |
| परिशिष्टे<br>१. वंशावळी-<br>२. निजामकालीन कागदपत्र<br>३. नकाशे<br>४. गढी व वाड्यांचे तलविन्यास<br>५. गढी व वाड्यांचे छायाचित्रे | २७६-३०७ |

शिवरायांचे आठवावे रूप ।
शिवरायांचा आठवावा प्रताप ।
शिवरायांचा आठवावा साक्षेप । भुमंडळी ॥१॥
शिवरायांचे कैसे बोलणे ।
शिवरायांचे कैसे चालणे ।
शिवरायांची सलगी देणे । कैसी असे ॥२॥
सकल सुखांचा केला त्याग ।
म्हणोनी साधिजे तो योग ।
राज्य साधनाची लगबग । कैसी केली ॥३॥
याहुनी करावे विशेष ।
तरीच म्हणवावे पुरूष ।
या उपरी आता विशेष । काय लिहावे ॥४॥
शिवरायांसी आठवावे ।
जीवित तृणवत मानावे ।
इहलोकी परलोकी उरावे । कीर्तिरूपे ॥५॥
निश्चयाचा महामेरू ।
बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥६॥

SIDDHI
PUBLISHING HOUSE
(National Publication)
Nanded, Maharashtra (India)
website : www.wiidrj.com

9 788195 397655

# लोककल्याणकारी राजा

## Benevolent King Shivchhatrapati



डॉ.बब्रुवान केरबाजी मोरे
संपादक